**समरी फौ. केस. क्र. ९६/२०२२**
**नि. क्र. ६०**

**<u>फौजदारी प्रकिया संहिताचे कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.</u>**

**आरोपीचे नाव** – सुनिल चंद्रकांत जाधव,

**वय** – ४६ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,

**राहणार**– कोसुंब, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

| | |
|---|---|
| प्र.क्र. १ | तुम्हाला मराठी भाषा समजते का ? |
| उत्तर | होय. |
| प्र.क्र. २ | फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला का व तो तुम्हाला समजला का ? |
| उत्तर | होय. |
| प्र.क्र. ३ | फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ कमलाकर सिताराम कनावजे यांचे साक्षीत असे आले आहे की, ते प्रियदर्शनी ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या. देवरुख, शाखा–देवरुख या फिर्यादी संस्थेत वसुली अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | ते तेथे कर्मचारी म्हणून कामाला आहेत, वसूली अधिकारी आहेत अगर कसे याबाबत मला माहित नाही. |
| प्र.क्र. ४ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादी पतसंस्था त्या संस्थेच्या सभासदांना कर्ज देणे व ठेवी स्वीकारणेचा व्यवसाय करते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खरे आहे. |
| प्र.क्र.५ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३४ कडील ठरावानुसार पत संस्थेच्या वतीने प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्याचा व चालविण्याचा अधिकार फिर्यादी पत संस्थेने त्यांना दिलेला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | मला माहित नाही. |

| | |
|---|---|
| प्र.क्र. ६ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादी प्रियदर्शनी ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या. देवरुख, या संस्थेचे तुम्ही सभासद आहात, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खरे आहे. |
| प्र.क्र. ७ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, दिनांक २८/११/२०१२ रोजी तुम्ही घरगुती अडचण म्हणून प्रियदर्शनी ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या. देवरुख, या शाखेकडून रक्कम रुपये ६०,०००/– कर्ज मागणी केली होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र. ८ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, दिनांक २१/०१/२०१३ रोजी तुम्ही मागितलेले कर्ज मंजूर होवून ती कर्ज रक्कम तुम्हाला देण्यात आली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र. ९ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३५ कडील कर्ज मागणीचा अर्ज तुम्ही फिर्यादी पतसंस्थेकडे केला होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.१० | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३६ कडील कर्जरोखा तुम्ही फिर्यादी पतसंस्थेला दिलेला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.११ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३७ कडील वचनचिठ्ठी तुम्ही फिर्यादी पतसंस्थेला दिलेली आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.१२ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, तुमचा कर्ज खाते क्र. १७२७ असा होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |

| | |
|---|---|
| प्र.क्र.१३ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही वेळोवेळी कर्ज रकमेची परतफेड केली नाही, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | मी कर्जच घेतले नव्हते. |
| प्र.क्र.१४ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, दिनांक १५/०१/२०२२ रोजी तुमच्याकडे मुद्दल रक्कम रुपये ६१,९९८/- व व्याज रक्कम रुपये ३८,१५८/- अशी एकूण रक्कम रुपये १,००,१५६/- थकीत होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.१५ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, तुमच्याकडे थकीत असलेल्या रक्कम रुपये १,००,१५६/- चे परतफेडीकरीता तुम्ही फिर्यादी पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांना रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा देवरुख येथील तुमच्या खात्याचा धनादेश क्र. ११८६५८ हा दिनांक १५/०१/२०२२ चा धनादेश दिला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.१६ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, निशाणी २९ कडील सदर धनादेशावर तुमची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर तुम्ही नमूद केलेला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.१७ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादी पतसंस्थेने सदर धनादेश रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती शाखा-देवरुख या बँकेत वठविणेसाठी दि. १७/०१/२०२२ रोजी जमा केला असता तो धनादेश त्याचदिवशी 'अपुरी रक्कम' या कारणास्तव न वठता परत करण्यात आला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.१८ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३० कडील धनादेश परतीचा मेमो तोच आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |

| | |
|---|---|
| प्र.क्र.१९ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामुळे त्यांनी वकीलांमार्फत तुम्हाला दिनांक ०४/०२/२०२२ रोजी नोंदणीकृत डाकेने नोटीस पाठविली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.२० | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३१ कडील दस्त म्हणजे त्या नोटीसची प्रत आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.२१ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, सदरची नोटीस तुम्हाला दिनांक १०/०२/२०२२ रोजी पोहोच झाली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.२२ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, नि. ३३ पोहोच पावती त्याबाबतची आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.२३ | त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, सदरची नोटीस प्राप्त होवूनही तुम्ही विहीत मुदतीत धनादेशाची रक्कम त्यांना परत केली नाही, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | हे खोटे आहे. |
| प्र.क्र.२४ | तुम्हाला या खटल्याबाबत काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | माझ्या बदनामीसाठी माझेविरुध्द हे षडयंत्र रचलेले आहे. |
| प्र.क्र.२५ | फिर्यादी पक्षाचे साक्षीदार तुमच्याविरुध्द साक्ष का देतात ? |
| उत्तर | मला बदनाम करण्याचा डाव असल्यामुळे. |
| प्र.क्र.२६ | तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचा आहे काय ? |
| उत्तर | होय. |
| प्र.क्र.२७ | तुम्हाला तुमच्या वतीने साक्षीदार तपासायचा आहे काय ? |
| उत्तर | मला काही पुरावा सादर करावयाचा आहे. |

| | |
|---|---|
| प्र.क्र.२८ | तुम्हाला प्रस्तुत खटल्याबाबत आणखी काय सांगावयाचे आहे काय ? |
| उत्तर | नाही. |

--------

आरोपीची सही

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.03.03 16:41:38 +0530

**(ब. द. तारे)**

दि.०३/०३/२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१, देवरुख

**<u>दाखला</u>**

सदरहु आरोपीचा जबाब माझेसमक्ष त्याने कथन केलेप्रमाणे घेण्यात आला.

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.03.03 16:41:31 +0530

**(ब. द. तारे)**

दि.०३/०३/२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१, देवरुख

**CERTIFICATE**

Cr.PC 313 Statement SCC No. 96/2022

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale (Grade-III) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 03/03/2025 |
| Statement signed by the presiding officer on | : | 03/03/2025 |
| Statement uploaded on | : | 03/03/2025 |